सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यास प्रशासकीय मान्यता...

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः कृविका २०१५ /प्र.क्र.२३७ /३-अे

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १८ जानेवारी, २०१६

वाचा : १) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या २० व्या बैठकीचे इतिवृत्त-शासन पत्र क्र.RKV-०४१५/C.R.३८/RKVY CELL, दि.२५.६.२०१५.

२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांचे पत्र क्रकृमावि/विप्र ४/आरकेव्हीवाय/३३/२०१६, दि.१३.१.२०१६

प्रस्तावना :

सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत उत्पादन विकास या प्रकल्प प्रकारातील तंत्रज्ञान प्रसार आणि शेतकरी जागृतीसाठी विविध योजना / कार्यक्रमांना प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यासाठी प्रकल्प खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. सदर प्रकल्प राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी ३४ जिल्हयात राबविण्यात येणार असून, केंद्र / राज्य / जागतिक बँक यांनी प्रायोजित / सहाय्यित विविध योजना / प्रकल्पांच्या यशोगाथा / दस्तऐवज तयार करणे. राज्य/केंद्र शासनाच्या योजना / कार्यक्रमांचा, नवीन तंत्रज्ञान तयार करून त्या साहित्याचा प्रिंट व ईलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसार करून शेतकरी जागृती निर्माण करणे, कृषि विभागाच्या विविध कार्यक्रम, मोहिमा राबविण्यासाठी लोक सहभाग वाढविणे, परिसंवाद व कार्यशाळा यांचे आयोजन करणे, ही या प्रकल्पाची उद्दिष्टे आहेत.

तदनुसार सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत तंत्रज्ञान प्रसार आणि शेतकरी जागृतीसाठी विविध योजना / कार्यक्रमांना प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यासाठी रु.२७९.७७ लक्ष एवढया प्रकल्प खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, तदनुषंगाने शासन पुढील निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः-

सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत तंत्रज्ञान प्रसार आणि शेतकरी जागृतीसाठी विविध योजना / कार्यक्रमांना प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जन जागृती मोहीम राबविण्यासाठी ₹.२७९.७७ लक्ष (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणसत्तर लक्ष सत्त्याहत्तर हजार फक्त) एवढया प्रकल्प खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच चालू वर्षाकरीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत या जन जागृती मोहिमेसाठी ₹.२७९.७७ लक्ष (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणसत्तर लक्ष सत्त्याहत्तर हजार फक्त) एवढा निधी मंजूर करण्यात येत आहे.

२. सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यासाठी सदर प्रकल्पांतर्गत समाविष्ट घटक व त्याकरिता मंजूर भौतिक व आर्थीक लक्षांक सोबतच्या तक्त्यानुसार राहील. (सोबत यादी जोडली आहे)

३. सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रस्तुत प्रकल्प राबविण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन कृषि विभागाच्या कार्यालयीन पध्दतीत अंतर्भाव करावा. व सदरहू प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राज्यात राबविण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये प्रकल्प आधारित कृषि विस्तार व जागृती मोहीम राबविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असलेला ₹ .२७९.७७ लक्ष निधी सन २०१५- १६ या चालू वित्तीय वर्षात अखर्चित राहणार नाही याची अंमलबजावणी यंत्रणांनी काळजी घ्यावी. तसेच संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी निधी विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळोवेळी सादर करण्याची कार्यवाही करावी.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१२२५२११८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vikram Nivrutti Dhamal

Digitally signed by Vikram Nivrutti Dhamal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=10d36944a4b86eab516b1b70183709c5fb570cfdf5a52755adfef51ed380b836, cn=Vikram Nivrutti Dhamal
Date: 2016.01.19 12:29:28 +05'30'

(विक्रम ढमाळ)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. आयुक्त,कृषि,महाराष्ट्र राज्य,पुणे
४. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई
५. महालेखापाल, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२ नागपूर
६. संचालक विस्तार व प्रशिक्षण तथा कृषि नोडल अधिकारी,कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
७. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड धरमपेठ, नागपूर
८. सर्व संचालक / कृषि सह संचालक, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

९. सर्व विभागीय कृषि सह संचालक
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
११. अवर सचिव /कार्यासन राकृवियो, कार्यासन २ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई ३२.
१२. वित्त विभाग कार्यासन व्यय-१/ अर्थ-३, नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय,मुंबई ३२.
१३. निवड नस्ती (का.३ अे)

* * *

शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
क्रमांकः कृविका २०१५ /प्र.क्र.२३७/३-अे, दिनांक : १८ जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र :-

(Rs in Lakhs)

S.N	Components	Applicable ongoing scheme of GoI/GoM		
		Name	Cost norm for subsidy	Total Cost as per Revised Project
१	Participation in state / regional exhibition/fair	ATMA A-५	@२.०० lakh per exhibition for participation	३०.००
२	Organising district level exhibition/Kisan mela /Fruit vegetabale show	ATMA B-८	@४.०० lakh per exhibition	१६.००
३	Information dissemination through printed media/ leaflet/folder etc	ATMA B-९	०	१३६.००
४	Development of technology package in digital form	ATMA B-१०	@०.२० lakh per dist.	१६.००
५	Innovation technology dissemination component § production of low cost films / Success stories and Pico Projector	ATMA annexre III(b)-२,३	@०.५० lakh per CD/Film	५१.००
६	Innovative activity § state level (Chitrarath-२०१६)	ATMA E-१	@२५.०० lakh	२५.००
७	Organizing state level workshop	ATMA A-१(a)	@०.७५ lakh per workshop	३.००
८	Administrative Conringency Charges १%	-	-	२.७७
	Total	--	-	२७९.७७

Vikram Nivrutti Dhamal

Digitally signed by Vikram Nivrutti Dhamal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=10d36944a4b86eab516b1b7018 3709c5fb570cfdf5a52755adfef51ed380b836, cn=Vikram Nivrutti Dhamal
Date: 2016.01.19 12:29:57 +05'30'

(विक्रम ढमाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन